




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026 मंगळवार दि. २१ जुलै २०२६

आवृती- पुणे,अहील्यानगर,मुबंई,ठाणे,पालघर,सिंधुदुर्ग,रत्नागिरी








संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ५ | वर्ष : ४ थे | अंक : २२१ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com


# लाडक्या बहिणीनंतर आता 'लाडका पत्रकार' योजना सुरू करा

## अकोला अधिवेशनातून राज्य सरकारकडे एकमुखी मागणी!

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या संयुक्त अधिवेशनात पत्रकार हिताचे १० महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर!

**अकोला जिल्हा प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई तथा पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्या संयुक्त विद्यमाने अकोला येथील हॉटेल कृष्णा इम्पेरियलमध्ये आयोजित करण्यात आलेले राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन २०२६ उत्साहपूर्ण वातावरणात आणि दिमाखदार पद्धतीने संपन्न झाले. राज्यभरातून आलेल्या पत्रकार, संपादक, वृत्तवाहिन्यांचे प्रतिनिधी आणि संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पत्रकारांच्या हक्क, सुरक्षा, कल्याण आणि पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा झाली. अधिवेशनात पत्रकारांच्या हितासाठी मांडण्यात आलेले १३ महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे होते. व्यासपीठावर माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, प्रदेश उपाध्यक्ष प्रा. महेश पानसे, प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, विदर्भ संपर्कप्रमुख अनुप भार्गव, विभागीय अध्यक्ष सुनील फुलारी, सौ. भारती सोमानी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे, सेवकराम तातोड, अकोला जिल्हाध्यक्ष गणेश सुरजुसे, श्रीमती अलका पचारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन, हार अर्पण आणि दीपप्रज्वलनाने झाली.

#### 'लाडका पत्रकार' योजनेची सर्वाधिक चर्चा:

अधिवेशनातील सर्वाधिक गाजलेला विषय म्हणजे राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेच्या धर्तीवर पत्रकारांसाठी लाडका पत्रकार योजना सुरू करावी, ही मागणी. हा महत्त्वपूर्ण ठराव प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सभागृहात मांडला. पत्रकार हे लोकशाहीचे चौथे स्तंभ असून कठीण परिस्थितीत जनतेसाठी सातत्याने कार्य करत असतात. त्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि कौटुंबिक सुरक्षेसाठी शासनाने स्वतंत्र कल्याणकारी योजना लागू करावी, अशी मागणी त्यांनी केली.

हा ठराव मांडताच उपस्थित पत्रकारांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्याचे स्वागत केले आणि एकमताने मंजुरी दिली. राज्य सरकारने पत्रकारांसाठी तातडीने लाडका पत्रकार योजना लागू करावी, अशी एकमुखी मागणी अधिवेशनातून करण्यात आली.

#### पत्रकार संरक्षणासाठी कठोर कायद्याची मागणी:

अधिवेशनात पत्रकारांवरील वाढते हल्ले, खोटे गुन्हे दाखल करणे, धमक्या, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर होणारे आघात आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेबाबत विशेष परिसंवाद आयोजित करण्यात आला. या चर्चासत्रात डॉ. विश्वासराव आरोटे, निलेश सोमानी, प्रा. महेश पानसे, नीरज शिरसाट, नयन मोंढे, गजानन वाघमारे, मधुकरराव बावणे, विजय चव्हाण आणि सुनील फुलारी यांनी सहभाग घेतला.

यावेळी पत्रकारांवर हल्ला करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई, पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि पत्रकारांच्या सुरक्षिततेसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्याची मागणी करण्यात आली.

#### डॉ. विश्वासराव आरोटे यांचे मार्गदर्शन:

मार्गदर्शन करताना डॉ. विश्वासराव आरोटे म्हणाले, लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेली पत्रकारिता अधिक सक्षम, निर्भय आणि निष्पक्ष राहणे ही काळाची गरज आहे. पत्रकारांनी कोणत्याही राजकीय, आर्थिक किंवा सामाजिक दबावाला बळी न पडता सत्य आणि जनहिताची भूमिका कायम ठेवली पाहिजे. पत्रकारितेमध्ये प्रलोभनांना स्थान नसावे. पत्रकारांनी संघटनेशी एकनिष्ठ राहून पत्रकारांच्या हक्कासाठी एकजुटीने लढा उभारला पाहिजे.

#### निलेश सोमानी यांचे आवाहन:

प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी यांनी पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजाप्रती असलेली जबाबदारी असल्याचे सांगितले. शासनाने पत्रकारांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारून त्यांना न्याय मिळेल अशी सक्षम यंत्रणा उभी करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पत्रकारांनी सत्याची कास सोडू नये, पिवळ्या पत्रकारितेपासून दूर राहावे आणि सामाजिक कार्याला प्राधान्य द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

#### १३ महत्त्वपूर्ण ठरावांना मंजुरी:

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारांच्या हक्कासाठी मांडलेले १३ ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. त्यामध्ये प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :

- **पत्रकारांसाठी लाडका पत्रकार योजना सुरू करणे.**
- **पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी.**
- **कोरोना काळापासून बंद असलेले रेल्वे पास पुन्हा सुरू करणे.**
- **एसटी महामंडळाच्या वातानुकूलित बसमध्ये पत्रकारांना मोफत प्रवासाची सुविधा.**
- **पत्रकारांसाठी घरकुल योजना सुरू करणे.**
- **आरोग्य विमा, अपघात विमा व निवृत्तीवेतन योजना लागू करणे.**
- **ग्रामीण पत्रकारांना अधिक अधिस्वीकृती देणे.**
- **पत्रकार कल्याणकारी मंडळ आणि वृत्तपत्र विक्रेता कल्याणकारी मंडळाचे काम तातडीने सुरू करणे.**
- **अधिस्वीकृती प्रक्रियेतील निकषांचा पुनर्विचार करणे.**
- **लघु वृत्तपत्रांना मुद्रण व कागदावरील जीएसटीमध्ये सवलत देणे.**
- **शासनमान्य यादीत नसलेल्या वृत्तपत्रांना पूर्वीप्रमाणे जाहिराती देणे.**
- **ज्येष्ठ पत्रकार सन्मान निधीच्या अटी शिथिल करणे.**
- **पत्रकारांच्या पाल्यांसाठी शिक्षणात विशेष सवलती व आरक्षणाचा विचार करणे.**








**१. 'लाडक्या बहिणीनंतर आता लाडका पत्रकार' योजनेची राज्य सरकारकडे एकमुखी मागणी!**
**२. अकोला अधिवेशनात पत्रकारांच्या हक्कांचा बुलंद आवाज; 'लाडका पत्रकार'सह १३ ठराव मंजूर**
**३. पत्रकारांच्या कल्याणासाठी 'लाडका पत्रकार' योजना राबवा; अकोला अधिवेशनातून शासनाला साकडे!**
**४. पत्रकार संरक्षण कायदा, घरकुल, विमा अन् 'लाडका पत्रकार' योजना; अकोला अधिवेशनात १३ ठराव मंजूर!**
**५. राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनात पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी एकजूट; 'लाडका पत्रकार' योजनेची मागणी!**
**६. अकोल्यातून पत्रकारांचा एल्गार; 'लाडका पत्रकार' योजनेसह १३ मागण्यांवर शिक्कामोर्तब!**
**७. पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षा आणि कल्याणासाठी अकोला अधिवेशनात महत्त्वाचे १३ ठराव मंजूर!**
**८. 'लाडका पत्रकार' योजनेसाठी राज्यभरातील पत्रकार एकवटले; अकोला अधिवेशनात एकमुखी ठराव!**

#### राज्यस्तरीय पुरस्कारांचे वितरण:

अधिवेशनात पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा व पत्रकारिता पुरस्कार, आरोग्य पत्रकारिता पुरस्कार, तिसरा डोळा पत्रकारिता पुरस्कार, उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार आणि आदर्श पत्रकारिता पुरस्कार विविध पत्रकारांना प्रदान करण्यात आले.

#### जिल्हाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचा सत्कार:

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरातून आलेल्या जिल्हाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, ज्येष्ठ पत्रकार आणि पदाधिकाऱ्यांचा सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करण्यात आला. अकोला येथे अधिवेशनाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल जिल्हाध्यक्ष गणेश सुरजुसे व त्यांच्या संपूर्ण टीमचाही गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणेश सुरजुसे यांनी केले. संचालन देवानंद गहिले, वैभव स्वामी आणि पुरस्कार वितरण समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. महेश पानसे यांनी केले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या पत्रकारांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे हे अधिवेशन अत्यंत यशस्वी ठरले. अधिवेशनात मंजूर करण्यात आलेले सर्व ठराव राज्य शासनाकडे पाठविण्यात येणार असून पत्रकारांच्या सन्मान, सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि कल्याणासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी एकमुखी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

---

## कर्जत विभागीय कार्यालयात उपकार्यकारी अभियंत्यावर मारहाणीचा आरोप; कामगार संघटनांचा आंदोलनाचा इशारा

**कर्जत (समर्थ गांवकरी)**

महावितरणच्या कर्जत विभागीय कार्यालयातील सहाय्यक लेखापाल श्री. सारंग बबन पुराणिक यांनी कर्जत उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता श्री. प्रविण रामदास वारे यांच्याविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे महावितरण वर्तुळात खळबळ उडाली असून कामगार संघटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे.

२० जुलै २०२६ रोजी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, श्री. पुराणिक हे कर्जत उपविभागाचा अतिरिक्त पदभार सांभाळत असताना ग्राहकाच्या नावातील बदलासंदर्भातील अर्जाची पडताळणी सुरू होती. त्यानंतर विभागीय कार्यालयात काम सुरू असताना उपकार्यकारी अभियंता श्री. वारे यांनी कार्यालयात येऊन आयडी वापरून अर्ज मंजूर का केला? असा जाब विचारत शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तक्रारीत पुढे नमूद करण्यात आले आहे की, या घटनेदरम्यान संबंधित अधिकाऱ्यांनी जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना कार्यालयातील इतर कर्मचारी उपस्थित असताना घडल्याचा दावा करण्यात आला असून त्यामुळे स्वतःच्या जीवितास धोका निर्माण झाल्याची भावना श्री. पुराणिक यांनी व्यक्त केली आहे. या प्रकरणाचे काही कर्मचारी साक्षीदार असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. श्री. पुराणिक यांनी संबंधित अधिकाऱ्याविरुद्ध विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली असून, जीवितास धोका असल्याने कर्जत पोलीस ठाण्यातही तक्रार दाखल केल्याचे त्यांनी म्हटले आहे. दरम्यान, या घटनेनंतर महाराष्ट्र वीज कामगार महासंघासह विविध कामगार संघटना आक्रमक झाल्या आहेत. संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी अधीक्षक अभियंता ,रमेशकुमार पवार अहिल्यानगर यांची भेट घेऊन दोषी अधिकाऱ्यावर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

---

## महाराष्ट्राचा लाडका कवी दत्तात्रय वारकड यांचा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने सत्कार

### कविवर्य दत्तात्रय वारकड अहिल्यानगरचे भूषण ठरले : वसंत लोढा

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यात पूर्वीपासूनच साहित्यिक चळवळ जोमाने काम करीत आहे. पुणे येथील काव्ययोग काव्य संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या , महाराष्ट्राचा लाडका कवी या स्पर्धेत राज्यातून १८७ कवींनी सहभाग नोंदविला होता.



अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत अहिल्यानगरचे कविवर्य दत्तात्रय वारकड यांची बहुमताने महाराष्ट्राचा लाडका कवी म्हणून झालेली निवड अहिल्यानगर जिल्हाला भूषणावह अशी ठरली आहे.

श्री.वारकड यांच्या संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या जीवनावरील ज्ञानज्योत या कवितेला रशिया दुबई तसेच देशातील अनेक राज्यातून भरभरून प्रतिसाद मिळाला.

कविवर्य दत्तात्रय वारकड अहिल्यानगरचे भूषण ठरले आहे.असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते तथा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट चे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट च्या वतीने महाराष्ट्राचा लाडका कवी प्रथम पुरस्कार विजेते कवीवर्य दत्तात्रय वारकड यांचा सत्कार पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल,महावीर कांकरिया, पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संचालक बाबासाहेब साठे, विश्वहिंदू परिषद जिल्हा प्रसिद्धीप्रमुख आदी उपस्थित होते.

यावेळी दत्तात्रय वारकड म्हणाले, महाराष्ट्राचा लाडका कवी हा बहुमान माझ्या एकट्याचा नसून सर्व नगरकरांचा आहे. अहिल्यानगर येथील सर्व रसिक प्रेक्षकांनी भरभरून प्रतिसाद दिला आहे. तसेच पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट हे साहित्य चळवळीला नेहमीच बळ देणारे कार्य करीत असते. त्यांच्या सत्काराने मी भारावून गेलो आहे.सुरज अग्रवाल यांनी सर्वांचे आभार मानले.

---

## स्व. अजितदादाचे जयंती सप्ताहानिमित्त पारनेर तालुक्यात सेवाकार्याची नवी सुरुवात

### रक्तदान, स्वच्छता, वृक्षारोपण, क्रिकेट स्पर्धा व गौरव सोहळ्याचे आयोजन

**पारनेर (समर्थ गांवकरी)**

सोमवार दि. २० जुलै २०२६ राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते स्व. अजितदादा पवार यांच्या जयंती सप्ताहानिमित्त सेवाकार्याची नवी सुरुवात या संकल्पनेतून पारनेर तालुक्यात विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पारनेर–नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर व पक्षाच्या इतर सर्व पदाधिकाऱ्यांच्या वतीने या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, समाजोपयोगी सेवाकार्यातून जयंती सप्ताह साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत दि. २२ जुलै रोजी सकाळी ९.०० वाजता आमदार काशिनाथ दाते जनसंपर्क कार्यालय, पारनेर येथे आनंदऋषी ब्लड बँक, अहिल्यानगर यांच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर सकाळी ११.३० वाजता पारनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, पंचायत समिती परिसरातील महात्मा ज्योतिबा फुले पुतळा, पारनेर वेश येथील सेनापती बापट स्मारक तसेच बाजारतळ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

याच दिवशी दुपारी २.०० वाजता भावळवणी व पारनेर शहरातील वरची वेस येथे वृक्षसंवर्धन व वृक्षारोपण कार्यक्रम होणार असून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येणार आहे. तसेच दि. २३ ते २७ जुलै या कालावधीत राळेगण थेरपाळ येथे स्व. अजितदादा पवार युवा चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत तालुक्यातील अनेक युवा संघ सहभागी होणार असून युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देण्याचा उद्देश आहे.



यासोबतच जयंती सप्ताहानिमित्त आयोजित गौरव सोहळ्यात तालुक्यातील आदर्श शेतकरी, आदर्श गोपालक, आदर्श कृषीकन्या तसेच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान करण्यात येणार आहे.

या उपक्रमांच्या माध्यमातून समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, रक्तदान आणि युवकांना प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात येणार असून, तालुक्यातील नागरिक, युवक, रक्तदाते व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन कार्यक्रम यशस्वी करावा, असे आवाहन तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर यांनी केले आहे.

# एम. एम. भवारी यांना शैक्षणिक कार्यासाठी जीवनगौरव पुरस्कार

## आदिवासी शिक्षण क्षेत्रातील योगदानाचा गौरव!

**अकोले (समर्थ गांवकरी)**

आदिवासी उन्नती सेवा मंडळाचे विश्वस्त तथा सचिव प्रा. एम. एम. भवारी यांना आदिवासी उन्नती सेवा मंडळ कर्मचारी सेवक पतसंस्थेच्या २८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकोले विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार तथा आदिवासी विकास महामंडळाचे संचालक वैभवराव पिचड यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला.

यावेळी प्रा. भवारी यांचा तुकाराम महाराज पगडी, शाल, पुष्पगुच्छ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष भरत घाणे, उपाध्यक्ष सी. बी. भांगरे, पतसंस्थेचे उपाध्यक्ष रामदास बांबळे, प्राचार्य राजेंद्र खाडे, मुख्याध्यापक कैलास तेलोरे, ज्ञानदेव पिचड, सुखदेव बोराडे, सुदाम सदगीर, प्रभाकर येलमामे, शिवराम कोंडार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रा. एम. एम. भवारी यांचा जन्म अकोले तालुक्यातील आदिवासी भागातील एका ग्रामीण कुटुंबात झाला. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी सत्यनिकेतन संस्थेच्या सर्वोदय विद्यामंदिरात प्राध्यापक म्हणून कार्य केले. त्यानंतर स्वर्गीय माजी मंत्री मधुकरराव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली आदिवासी उन्नती सेवा मंडळाच्या माध्यमातून आदिवासी व दुर्गम भागात आश्रमशाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालये उभारण्याच्या कार्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले.

एकेकाळी शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना दूरवर जावे लागत असे. अनेक पालक रोजगारासाठी स्थलांतरित होत असल्याने मुलांचे शिक्षण अर्धवट राहण्याची वेळ येत होती. अशा परिस्थितीत ग्रामीण व आदिवासी भागात शिक्षणाची दारे उघडून हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात प्रा. भवारी यांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली. आज संस्थेच्या शाळा व आश्रमशाळा गुणवत्तापूर्ण शिक्षण, निवास, भोजन आणि विद्यार्थी कल्याणाच्या सुविधांमध्ये आघाडीवर असल्याचे मानले जाते.






संस्थेच्या प्रत्येक शाळेत नियमित भेटी देऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शैक्षणिक प्रगती आणि मूलभूत सुविधांची पाहणी करण्यावर त्यांनी विशेष भर दिला. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत त्यांनी कधीही तडजोड केली नाही. त्यांच्या कार्याची दखल घेऊन यापूर्वीही त्यांना विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

यावेळी वैभवराव पिचड यांनी प्रा. भवारी यांच्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ज्येष्ठांचे मार्गदर्शन, त्यांचे विचार आणि त्याग यामुळेच संस्था आजही यशस्वीपणे वाटचाल करत आहे. त्यांनी घालून दिलेली शैक्षणिक मूल्ये व आचारसंहिता भविष्यातही संस्थेची प्रेरणाशक्ती राहील.

पुरस्कार स्वीकारताना प्रा. एम. एम. भवारी म्हणाले, हा जीवनगौरव पुरस्कार माझा एकट्याचा नसून संस्थेतील प्रत्येक विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी आणि सहकाऱ्यांचा आहे. समाजासाठी आणि विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी केलेल्या सामूहिक कार्याचा हा सन्मान असून तो मी सर्वांना अर्पण करतो.

पतसंस्थेचे चेअरमन सुधीर कानवडे यांनी संस्थेच्या गुणवंत विद्यार्थी व सभासद पाल्यांचा सत्कार करताना सांगितले की, पतसंस्था ही कर्मचारी वर्गाची विश्वासार्ह आर्थिक आधारव्यवस्था असून संस्थापकांनी दिलेल्या मूल्यांनुसार पारदर्शक कारभार व शिस्तबद्ध कार्यपद्धती कायम ठेवली जाईल.

कार्यक्रमास दत्ता जाधव, मच्छिंद्र शिंदे, किरण चौधरी, अशोक नाईकवाडी, चंद्रशेखर टकले, गणेश गायकवाड, गणेश मैड, सौ. मीनाक्षी पाटील, बेबी हासे, कार्यकारी संचालक संजय कडलग यांच्यासह पतसंस्थेचे पदाधिकारी, कर्मचारी, सभासद व शिक्षणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कृषि सहाय्यक आता थेट ग्रामपंचायत कार्यालयात बसणार;

## झेडपी मुख्य कार्यकारी अधिकार्यांनी काढले पत्र

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

क्षेत्रीय पातळीवर केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजना शेतकर्यांपर्यंत पोहोचवणारे कृषि सहाय्यक आता थेट ग्रामपंचायत कार्यालयात बसून शेतकर्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

कृषि सहाय्यकांना ग्रामस्तरावर कार्यालयीन कामकाजासाठी स्वतंत्र जागा व फर्निचर उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने २०१९ मध्ये घेतला होता. मात्र, त्यावर आता गांभिर्याने अंमलबजावणी होणार आहे.

गाव पातळीवर ग्रामपंचायत इमारत अथवा आवारात कृषी साहयक, उपकृषी अधिकारी व मंडल अधिकारी यांना जागा उपलब्ध करून देण्याबाबतचे पत्र जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील १४ गटविकास अधिकार्यांना काढले आहे.

यामुळे लवकर जिल्ह्यातील ४९ मंडल कृषी अधिकारी, ९८ उपकृषि अधिकारी व ५८८ कृषी साहयक यांना बसण्यासाठी त्यात्या गावातील ग्राम पंचायतींच्या कार्यालयात जागा उपलब्ध होणार आहे.

राज्यात सध्या सुमारे ११ हजार ५९९ कृषि सहाय्यक कार्यरत आहेत. नैसर्गिक आपत्तीचे सर्वेक्षण करणे, नवीन तंत्रज्ञान शेतकर्यांपर्यंत पोहोचवणे, कीड-रोग नियंत्रण आणि खतांच्या नियोजनाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे अशा अनेक जबाबदार्या त्यांच्यावर असतात. शेतकर्यांना त्यांच्या कामासाठी कृषि सहाय्यकांची भेट घेणे सोपे व्हावे, यासाठी शासनाने या कृषी साहयक यांच्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कार्यालयीन कामकाजासह त्यांचे दप्तर ठेवण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांनी कृषि सहाय्यकांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कार्यालयीन दस्तऐवज व कामकाजासाठी १५० ते २०० चौरस फूट जागा तात्काळ उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत.

जागा उपलब्ध झाल्यानंतर तेथे टेबल, खुर्ची आणि कपाटासारख्या आवश्यक फर्निचरची व्यवस्था करण्याची जबाबदारी पुणे कृषि आयुक्तालयाचे आयुक्त यांच्यावर सोपवण्यात आली आहे.नगर जिल्ह्यात काही मोठ्या ग्राम पंचायतींनी दूरदृष्टी ठेवत यापूर्वीच त्यांच्या इमारती अथवा आवारात कृषी विभागाला जागा देवून त्या ठिकाणी त्यांचे कार्यालय सुरू करण्यास मदत केलेली आहे. मात्र, अनेक ठिकाणी ते शक्य झालेले नाही. यामुळे आजही जिल्ह्यातील ५८८ ठिकाणी कृषी विभागाला गाव अथवा ग्रामपंचायत पातळीवर कार्यालय सुरू करता आलेले नाही.

कृषि सहाय्यकाचे कार्यालय निश्चित झाल्यावर त्या ठिकाणी तसा फलक लावण्यात येईल. या फलकावर कृषि सहाय्यकाचे पूर्ण नाव, मोबाईल क्रमांक, कामाचे दिवस आणि वेळ स्पष्टपणे नमूद करावी लागणार आहे.

# जखणगाव ग्रामपंचायत कार्यालयाला अनधिकृत कुलूप; लोकनियुक्त सरपंचांनी व्यक्त केली जीवितास धोका असल्याची भीती!

**अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्ह्यातील जखणगाव ग्रामपंचायत कार्यालयाला काही समाजकंटकांनी अनधिकृतपणे कुलूप लावल्याने ग्रामपंचायतीचे कामकाज ठप्प झाले असून, जनगणनेशी संबंधित महत्त्वाची कागदपत्रे कार्यालयात अडकून पडली आहेत. या प्रकारामुळे गावातील शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली असल्याचा आरोप लोकनियुक्त सरपंच डॉ. सुनील गंधे यांनी केला आहे.

डॉ. गंधे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही विघ्नसंतोषी प्रवृत्तीच्या व्यक्तींनी राजकीय आकसातून काही तरुणांच्या भावना भडकवून ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात वातावरण निर्माण केले आहे. या पार्श्वभूमीवर दोन-तीन व्यक्तींनी आपल्याला जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही त्यांनी दावा केला आहे.

सरपंचांच्या म्हणण्यानुसार, शुक्रवारी काही व्यक्तींनी ग्रामपंचायत कार्यालयाला परवानगीशिवाय कुलूप लावले. याबाबत पोलिसांशी संपर्क साधून परिस्थिती समजावून सांगितली असतानाही संबंधित व्यक्तींनी कुलूप काढण्यास नकार दिला. उलट, मीच कुलूप लावले आहे, मी उघडणार नाही; काय करायचे ते करून घ्या, अशी अरेरावीची भाषा वापरल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.

या घटनेमुळे ग्रामपंचायतीचे दैनंदिन कामकाज, तसेच सुरू असलेल्या जनगणनेचे काम गंभीरपणे प्रभावित झाले आहे. महत्त्वाची शासकीय कागदपत्रे कार्यालयात अडकून राहिल्याने प्रशासनास अडचणी निर्माण झाल्या आहेत. डॉ. सुनील गंधे यांनी आपल्या जीवितास धोका असल्याची भीती व्यक्त करत, गावातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून संबंधितांवर योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. तसेच ग्रामविकासाच्या कामात अडथळा निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना वेळीच आळा घालण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.




# सर्वत्र चांगला पाऊस पडून शेतकरी सुखी होऊ दे : मा कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांची जगन्नाथ पुरी येथे प्रार्थना

## लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी घेतले जगन्नाथ पुरी येथे दर्शन

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी सततच्या विकास कामांमधून संगमनेर तालुका हा विकासाचे मॉडेल बनवला आहे .याचबरोबर प्रत्येक गावात विविध मंदिरे व सभामंडप निर्माण केले आहे. किंबहुना राज्यामध्ये सर्वाधिक चांगली मंदिरे आणि सर्वाधिक सप्ताह करणारा तालुका म्हणून संगमनेर ची ओळख निर्माण केली असून नुकतीच त्यांनी ओडिसा येथील जगन्नाथ पुरी येथे भेट असून राज्यात चांगला पाऊस पडावा याकरता जगन्नाथ चरणी प्रार्थना केली आहे.

ओडिसा येथील जगप्रसिद्ध श्रीक्षेत्र पुरी मधील जगन्नाथ रथयात्रा ही भारतातील भाविकांची आढळत श्रद्धा असलेली मोठी रथयात्रा आहे. शतकानूशतके चालत आलेली ही पवित्र परंपरा भारताच्या समृद्ध व सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवत असते. समाजातील सर्व मानव जातीला समता सेवा प्रेम भक्तीचा संदेश देणारी ही यात्रा असून या यात्रेला महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी भेट देऊन दर्शन घेतले.

याप्रसंगी जगन्नाथ पुरी देवस्थान ट्रस्टच्या वतीने महाराष्ट्राचे माजी महसूल व कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांचा सत्कार करण्यात आला याप्रसंगी ओरिसा राज्यातील काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष वरिष्ठ नेते आणि शासकीय अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी कृषी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, संपूर्ण देशामध्ये यावर्षी अलनिनोचा प्रभाव जाणवतो आहे. यामुळे काही भागांमध्ये पाऊस झाला नाही. तर महाराष्ट्रामध्ये सह्याद्री खोरे वगळता इतर भागांमध्ये अजूनही पाऊस नाही. विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र या ठिकाणी सुद्धा काही ठिकाणी पेरण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त आहे. ओडिसा राज्यातही पाऊस कमी झालेला आहे. देशातील शेतकरी हा जगाचा पोशिंदा असून पाऊस चांगला झाला तर तो सुखी समाधानी असतो. चांगल्या पावसामुळे सर्व राज्यांमधील नागरिक आनंदी व सुखी समाधानी होतात. पशुपक्षी प्राणी आनंदी होतात. म्हणून देशभरात चांगल्या पावसाची गरज आहे.



# रायते ग्रामपंचायतीमार्फत शाळेस रोपवाटप कार्यक्रम

**संगमनेर (समर्थ गांवकरी)**

'एक पेड माँ के नाम ' या उपक्रमांतर्गत तसेच पर्यावरण संवर्धन, वृक्षसंवर्धन व विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची भावना रुजविण्याच्या उद्देशाने ग्रामपंचायत रायते यांच्या वतीने शाळेला विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे भेट देण्यात आली. या प्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. आवेज पिरजादे, उपाध्यक्ष सौ.सविता सचिन कडलग, तसेच ड्वउ चे माजी अध्यक्ष श्री. विजय सुतार, तसेच जि.प.शाळेचे मुख्याध्यापक प्रतिभा दुरगुडे मॅडम , सह शिक्षिका शितल वेताळ मॅडम उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वृक्षारोपणाचे महत्त्व, पर्यावरण संरक्षणाची गरज आणि प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संदेश देण्यात आला. ग्राम पंचायतीने दिलेली रोपे शाळेच्या परिसरात तसेच विद्यार्थ्यांच्या हस्ते योग्य ठिकाणी लावण्यात येणार असून त्यांचे नियमित संगोपन करण्याची जबाबदारीही विद्यार्थ्यांनी स्वीकारली. ग्रामपंचायतीने केलेल्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करून हरित व स्वच्छ परिसर घडविण्यास निश्चितच प्रेरणादायी ठरेल



# मुलींनी अन्यायाविरुद्ध सक्षमपणे उभे राहणे ही काळाची गरज : प्रवीण कदम

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयात स्नेहालय, अहिल्यानगर यांच्या वतीने महिला सुरक्षा आणि कायदे या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. यावेळी मुलींनी अन्यायाविरुद्ध सक्षमपणे उभे राहणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन स्नेहालयचे प्रतिनिधी प्रवीण कदम यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे या होत्या.

प्रवीण कदम यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, स्नेहालय या सेवाभावी संस्थेचे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी एचआयव्ही बाधित महिला, अन्याय-अत्याचारग्रस्त महिला व मुली तसेच अनाथ बालकांसाठी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. अनेक महिला व मुली अन्याय-अत्याचाराविरोधात बोलण्यास घाबरतात, त्यामुळे गुन्हेगारांचे मनोबल वाढते. त्यामुळे कोणत्याही दबावाला बळी न पडता मुलींनी निर्भयपणे आपले म्हणणे मांडले पाहिजे.

यावेळी त्यांनी पोस्को (POCSO) कायद्याचे महत्त्व, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या विविध कायद्यांची माहिती देत स्नेहालय संस्था अन्यायग्रस्तांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहत असल्याचे सांगितले. तसेच 'उडान' प्रकल्पाच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंधासाठी स्नेहालय राबवत असलेल्या उपक्रमांची माहितीही त्यांनी विद्यार्थिनींना दिली. मार्गदर्शनानंतर त्यांनी विद्यार्थिनींशी व्यक्तिगत संवाद साधत त्यांना मनमोकळेपणाने व्यक्त होण्यासाठी प्रोत्साहित केले.

रयत गुरुकुल प्रकल्पांतर्गत 'आनंददायी शनिवार' या उपक्रमाच्या माध्यमातून या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी व्यासपीठावर विकास सुतार, बापूराव औटी, विद्यालयाचे पर्यवेक्षक बाळासाहेब शिंदे, विक्रम वाघ आणि गुरुकुलप्रमुख किरण शिंदे यांची उपस्थिती होती.

# लोणी व्यंकनाथमध्ये बिबट्याची दहशत; गाय व बैलाचा बळी, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील लोणी व्यंकनाथ परिसरात बिबट्याची दहशत दिवसेंदिवस वाढत असून, रविवारी (दि. १९ जुलै) मध्यरात्री बिबट्याने एका बैलाचा बळी घेतला, तर दुसरी गाय ओढून नेल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, वन विभागाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. गेल्या वर्षभरापासून लोणी व्यंकनाथ येथील उत्तर काकडेवाडी व दक्षिण काकडेवाडी परिसरात बिबट्यांचा मुक्त संचार सुरू असून, अनेक वेळा जनावरांवर हल्ले झाल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शेतकरी जीव मुठीत धरून शेतीची कामे करत असून, मजूरही या भागात काम करण्यास धजावत नसल्याचे स्थानिकांनी सांगितले.




रविवारी मध्यरात्री बिबट्याने अशोक मुरलीधर काकडे यांच्या बैलावर हल्ला करून त्याचा फडशा पाडला. त्याच रात्री नागवडे साखर कारखान्याचे माजी संचालक दिलीपराव काकडे यांची गाय बिबट्याने ओढून नेल्याची घटना घडली. संबंधित गाईचा अद्याप शोध लागलेला नसल्याची माहिती दिलीपराव काकडे यांनी दिली.

परिसरातील शेतकरी वाड्या-वस्त्यांवर राहून शेती व दुग्धव्यवसाय करतात. अनेकांनी कर्ज काढून दुभती जनावरे खरेदी केली आहेत. मात्र, बिबट्यांकडून वारंवार होणाऱ्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे ज्या भागात बिबट्यांचा वावर अधिक आहे, त्या ठिकाणी वन विभागाने तातडीने पिंजरे लावून बिबट्यांना जेरबंद करावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. अन्यथा भविष्यात शेतकरी, महिला व लहान मुलांवरही हल्ल्याची शक्यता नाकारता येत नसल्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, नुकसानग्रस्त शेतकरी अशोक काकडे यांनी घटनेची माहिती ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर यांना दिली. त्यानंतर कुरुमकर यांनी रेंज फॉरेस्ट ऑफिसर दीपाली भगत यांच्याशी संपर्क साधून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई देण्याची मागणी केली. त्यानुसार वनरक्षक चंद्रकांत मरकड व वनमजूर नारायण कराळे यांनी घटनास्थळी भेट देत काही तासांतच मृत बैलाचा पंचनामा केला.

यावेळी नुकसानग्रस्त शेतकरी अशोक मुरलीधर काकडे, अमोल विकास काकडे, पंकज जिजाबा काकडे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

## निविदा सूचना नोटीस क्र. १/२०२६ - २७

**पंचायत समिती आंबेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे**

मा. गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती आंबेगाव सन २०२६-२०२७ करिता खाली नमूद केलेल्या कामांची सिलबंद निविदा सार्वजनिक बांधकाम / जिल्हा परिषद पुणे यांचेकडील नोंदणीकृत ठेकेदाराकडून बंद लिफाफा पद्धतीने मागवित आहोत. कोरी निविदांचा नमुना पंचायत समिती आंबेगाव (घोडेगाव), ता. आंबेगाव, जि.पुणे या कार्यालयात सुट्टीचे दिवस वगळून दिनांक २१/०७/२०२६ ते दिनांक २७/०७/२०२६ या कालावधीमध्ये कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ या वेळेत विक्रिस उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकिय रक्कम | अनामत रक्कम | कोरी निविदा रक्कम | काम पुर्ण करण्याचा कालावधी | नोंदणीकृत कंत्राट दाराचा वर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे पिंगळवाडी हनुमान मंदिर ते नागेश्वर मंदिर रस्ता. | पंचायत समिती उपकर निधी सन २०२५-२६ | ५५५५०३ /- | ७००० /- | ५९० /- | ३ महिने | पुणे जिल्हा परिषद, पुणे नोंदणीकृत सर्वसाधारण (खुला वर्गातील १ ते ५ (अ) | |
| २ | कुशिरे ग्रामपंचायत अंतर्गत दिगद गावठाण ते मोरशीळ वस्ती रस्ता करणे. | पंचायत समिती उपकर निधी सन २०२५-२६ | ३७९९३८ /- | ४५०० /- | ५९० /- | ३ महिने | | |

**टिप :-** १) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. २) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष दिनांक -२७/०७/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पोहोचणे आवश्यक आहे. ३) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा तपशिल निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधिन राहून निविदाधारक / ठेकेदारास लागू राहतील याची नोंद घ्यावी. ४) विहित मुदती नंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्विकारली जाणार नाहीत. ५) प्राप्त निविदा / दरपत्रके दिनांक -२८/०७/२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता सर्वांसमक्ष उघडली जातील याची नोंद घ्यावी. ६) दरपत्रकांबाबत काही हरकत असल्यास त्याच ठिकाणी समक्ष घेणेत यावी. ७) दरपत्रक / निविदा स्विकृतीनंतर तक्रार / हरकत विचारात घेतली जाणार नाही. ८) सदर कामाची अनामत, दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर अगर नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवले आहेत. ९) वरील अटी व शर्तीस अधिन राहून दरपत्रके सादर करावीत.

**सही /-**
**उप अभियंता**
**जि.प.बांधकाम उपविभाग आंबेगाव**

**सही /-**
**गट विकास अधिकारी (उ.श्रे.)**
**पंचायत समिती आंबेगाव**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्त्वाचे

## खेड व घोडेगाव न्यायालयाकडुन घोडेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत एकाच दिवशी ४ स्वतंत्र गुन्हयांमध्ये ८ आरोपींना शिक्षा

**मंचर (समर्थ गांवकरी)**

घोडेगाव पोलीस ठाण्याच्या प्रभावी तपासामुळे खेड व घोडेगाव न्यायालयाकडुन एकाच दिवशी ४ स्वतंत्र गुन्हयांमध्ये ८ आरोपींना शिक्षा सुनावण्यात आली आहे.अशी माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पवार यांनी दिली.

१) गु.र.नं.३०३/२०२४ भा. न्या. सं. कलमे १०९, ११८(१), ११८(२), ११५, ३५२, ३५१(३), ३(३) अन्यवे दाखल गुन्हयातील आरोपी आकाश दत्तात्रय काळे,लत्ता दत्तात्रय काळे दोघेही रा.घोडेगाव ता.आंबेगाव यांना खेड न्यायालयाने दोषी ठरविले.न्यायालयाने आरोपींना कलम ११८(१) अंतर्गत १ वर्षे सश्रम कारावास व १००० रूपये दंड व दंड न भरल्यास १ महीना साधी कैद, तसेच कलम ११५ अंतर्गत ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.२) गु.र.नं.३०४/२०२४ भा.न्या.सं. कलमे ११८(१),११५,३५२,३५१ (२), ३(३), ३३२ (उ) अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी गणेश चंद्रशेखर उनकुले रा. घोडेगाव ता.आंबेगाव यास खेड न्यायालयाने दोषी ठरविले. आरोपींना कलम ३३२ (उ) अंतर्गत १ वर्षे सश्रम कारावास व १००० रूपये दंड कलम ११८(१) अंतर्गत १ वर्षे सश्रम कारावास व १००० रूपये दंड व दंड न भरल्यास १ महीना साधी कैद, तसेच कलम ११५ अंतर्गत ६ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा सुनावली आहे.३) गु.र.नं. १८०/२०२४ दारूबंदी कायदा कलम ८५(१),११०,११२,११७ अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी प्रसाद शांताराम सैद,किशोर तुळशीराम काळे यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव यांनी दोषी ठरविले. सदर आरोपीस न्यायालयाने पोलीस अधिनियम, १९५१ कलम ११०,११२,११७ मध्ये १२०० रूपये दंड, व दंड न भरल्यास ७ दिवस साधा कारावास, तसेच महा दारूबंदी कायदयानुसार ८५ (१) मध्ये कोर्ट उठे पर्यंत कोर्टामध्ये बसुन राहण्याची शिक्षा तसेच ५००० रूपये दंड, व दंड न भरल्यास ७ दिवस साधा कारावास शिक्षा सुनावली आहे.४) गु.र.नं.१५२/२०१९ भा. द .वि.कलम ३२४,३२३,५०४,५०६,३४ अन्वये दाखल गुन्हयातील आरोपी अमर अर्फ सोनु काशिनाथ डगळे ,सुनिल सोमनाथ बांबळे,संदिप फकिर असवले यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, घोडेगाव यांनी दोषी ठरविले. भा.द.वि. ३२४ मध्ये प्रत्येकी ५००० रूपये दंड, व दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास तसेच भा.द.वि. कलम ३२३ मध्ये १००० रूपये दंड, व दंड न भरल्यास १ महीना साधा कारावास याप्रमाणे शिक्षा सुनावली आहे.

## परीतेतील अन्नछत्राला दुसऱ्या दिवशीही उत्स्फूर्त प्रतिसाद

### चरणसेवा, अन्नदान आणि सेवाभावाचा वारकऱ्यांना दिलासा



■ **संत निळोबाराय पालखी सोहळ्याचे खासदार नीलेश लंके यांनी केले स्वागत**

**सोलापूर (समर्थ गांवकरी)**

खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून नीलेश लंके प्रतिष्ठान व 'आपला मावळा' सामाजिक संस्थेच्या वतीने सोलापूर जिल्ह्यातील परीते येथे पंढरीच्या वारकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेल्या अन्नछत्र उपक्रमाला सोमवारी दुसऱ्या दिवशीही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अन्नदानासोबत बाटलीबंद पाणी, गरमागरम वडा-पाव, वाफाळलेला चहा तसेच 'चरणसेवा' या आरोग्य उपक्रमाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला. उपक्रमातील नियोजन, आत्मीयता आणि सेवाभाव पाहून वारकऱ्यांनी खासदार नीलेश लंके यांच्या या सामाजिक उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले.

दुसऱ्या दिवशी सकाळपासूनच अन्नछत्र परिसरात वारकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पंढरीच्या दिशेने निघालेल्या दिंड्यांमधील वारकऱ्यांनी विश्रांती घेत गरमागरम वडा-पाव, चहा आणि पिण्याच्या पाण्याचा लाभ घेतला. लांबच्या प्रवासामुळे थकलेल्या भाविकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेली 'चरणसेवा' विशेष आकर्षण ठरली.

## आंबेगाव वसाहत येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात दिंडी सोहळा उत्साहात संपन्न



**मंचर (समर्थ गांवकरी)**

आंबेगाव वसाहत ता.आंबेगाव येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त दिंडी सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.अशी माहिती मुख्याध्यापक पी.डी.चव्हाण यांनी दिली. श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विठ्ठल-रुक्मिणी व पालखीचे पूजन करून गावातून पालखी मिरवणूक काढण्यात आली.

या सोहळ्यात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ व सरपंच सहभागी झाले. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी भक्तिगीते, नृत्य आणि दिंडीत उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या शेवटी आरती करून छोट्या वारकऱ्यांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन ए.के.लोहकरे यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी व्ही.जी. काळे, आर.बी.राजगुरु, ए.के.लोहकरे, आर.बी.राक्षे, एल.पी. वाघ, व्ही.एच.गायकवाड, जी.एस. विसावे आणि आर.एस. बटवाल यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महालक्ष्मी विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी प्रा.सचिन लगड तर उपाध्यक्ष पदी नवनाथ जाधव यांची निवड

**राजूर (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील अतिदुर्गम डोंगराळ भाग म्हणून ओळख असलेल्या तसेच मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानामध्ये तालुक्यात प्रथम मानांकन प्राप्त केलेल्या पिंपळगाव नाकविंदा येथील महालक्षी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी प्रा.सचिन किसनपाटील लगड तर उपाध्यक्षपदी नवनाथ नारायण जाधव यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.

येथील विद्यालयात विद्यालयाचे प्राचार्य सुनिल धुमाळ यांच्या अध्यक्षतेखाली पालक तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची नुकतीच सहविचार सभा संपन्न झाली.या सहविचार सभेत वरील निवडी एकमताने संमत करण्यात आल्या.

या समितिवर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांसह एकूण पंधरा अन्य सदस्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहे.

सचिवपदी प्राचार्य सुनिल धुमाळ, शिक्षक प्रतिनिधि रामदास कासार, पालक प्रतिनिधी देवराम लक्ष्मण बगनर, संदीप गणपत वाळके,कृष्णा विठ्ठल तातळे, संदीप माधव आभाळे, गोरक्ष रामा चावडे,अर्जुन हरिभाऊ लगड, सविता नवनाथ लगड,अश्विनी अक्षय शिंदे,स्वाती दिनेश मुंढे,कविता मारूती बगनर, मंदा पोपट सदगीर आदिंची एकमताने निवड करण्यात आली.

या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड वसंतराव मनकर, सचिव मंगेशराव नवले, ग्रामपंचायत सरपंच लक्ष्मण सोंगाळ, उपसरपंच मारूती काळे,सर्व सदस्य, पोलीस पाटील चंद्रकांत लगड, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष बबनराव आभाळे, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष भाऊसाहेब लगड, स्थानिक स्कुल कमिटिचे अध्यक्ष मारूती आभाळे,पालक, शिक्षक तसेच नागरिकांकडून अभिनंदन केले जात आहे.

यावेळी उपस्थित सर्व शिक्षकांनी पालकांच्या विविध समस्या समजावून घेतल्या तसेच योग्य मार्गदर्शन करून सर्व समस्यांचे निरसन केले.

यावेळी शिक्षक प्रतिनिधी रामदास कासार यांनी सामितीचा उद्देश तसेच ध्येय व धोरणे याविषयी माहिती दिली. याप्रसंगी सुत्रसंचलन केले तसेच उपस्थितांचे आभार मानले. शैक्षणिक,सामाजिक,राजकीय आणि विकासात्मक कार्यात सक्रिय असणाऱ्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा विद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच उपयोग होईल. विद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना देणे तसेच पालक- शाळा समन्वय अधिक दृढ करण्यासाठी ते प्रभावी योगदान देतील - प्राचार्य सुनिल धुमाळ स्थानिक समुदाय, पालक आणि शिक्षकांचा शालेय काम काजात सहभाग वाढवणे आणि शाळेचा सर्वांगीण विकास करणे हा या समितीचा मुख्य उद्देश आहे. एकतर शाळा गावात पाहीजे नाहीतर ग्रामस्थांनी वेळोवेळी शाळेत गेले पाहीजे असे असले तर निश्चितच त्या शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढीस लागते.यानुसार गुणवत्तेत अधिक भर देण्यासाठी पुर्णपणे प्रयत्न करील- प्रा.सचिन लगड, अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समिती




# जुन्नर भाजीपाला विक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध न झाल्यास मनसे नगरपरिषदेला टाळे ठोकणार

**शिवनेरी (समर्थ गांवकरी)**

जुन्नर शहरातील इतिहासकालीन दादोजी कोंडदेव बुरुंजवळील भाजी विक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी .

१५ दिवसात पर्यायी जागा न दिल्यास नगरपालिका कार्यालयाला टाळे ठोकण्यात येईल व ८५ भाजी विक्रेते नगरपालिकेला घेरावा घालून बसतील होणाऱ्या परिणामाची जबाबदारी मुख्याधिकारी चरण कोल्हे यांची राहील असे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हाध्यक्ष मकरंद पाटील भाजी विक्रेत्यांच्या सह्या घेऊन सांगितले आहे .

निवेदनात असे म्हटले आहे की , बुरूंज जवळी जागेत २ वर्षापासून भाजीपाला व्यवसाय सुरु आहे. या जागेत शहरातील सामाजिक घटकांना विविध कार्यक्रमाला व ट्रॅफिक यांचे कुठल्याही प्रकारचे उल्लंघन न करता भाजी विक्रेते व्यवसाय करीत होते.

मागील आठवड्यात झालेल्या पावसामुळे बुरुंज थोड्या प्रमाणात ढासळला . मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी भाजी विक्रेत्यांना येथील जागा सोडण्यास सांगितले.

८५ विक्रेतांना दुसरी पर्याय जागा नसल्यामुळे व्यवसाय बंद करण्याशिवाय पर्याय उरला नाही . मुख्याधिकारी कोल्हे यांनी २ वर्षांपूर्वी बैलबाजार येथील तोंडी पर्याय जागा दिली, पण जुन्नर न्यायालयीन कोर्टाने या जागेवर बसण्यासाठी बंदी घातली . त्यावेळी विक्रेत्यांवर अन्याय झाला .

जुन्नर नगरपरिषद नगरपालिका निवडणुकीच्या वेळी सर्व उमेदवारांनी आश्वासन दिली , पण आजप्रश्न सोडवण्यासाठी कोणीही नगरसेवक विक्रेत्यांबरोबर आले नाही.

महात्मा फुले भाजीमंडई परदेशपुरा येथे बांधकाम चुकीचे झालेले आहे . यामुळे जुन्नर नगरपरिषद नोंदणीकृत भाजीविक्रेत्यांना जागा उपलब्ध करून द्यावी. १५ दिवसानंतर जुन्नर नगरपरिषद नगरपालिकेला टाळे ठोकणार व ८५ भाजी विक्रेते नगरपालिकेला घेरावा घालून बसतील होणाऱ्या परिणामाची जबाबदारी मुख्याधिकारी चरण कोल्हे यांची राहील असे महाराष्ट्र नवनिर्माण सेना पुणे जिल्हा अध्यक्ष मकरंद पाटे यांनी भाजी विक्रेत्यांच्या सह्या घेऊन निवेदनाद्वारे सांगितले.



# पेट्रोलपंप डिलरशिपच्या आमिषाने जामखेडच्या व्यावसायिकाची ८४.५३ लाखांची ऑनलाइन फसवणूक

### प्रोसेसिंग फी, परवाना व प्रशासकीय शुल्कांच्या नावाखाली उकळले लाखो रुपये

### दोघांविरुद्ध सायबर पोलिसांत गुन्हा

**जामखेड (समर्थ गांवकरी)**

पेट्रोलपंपाची डिलरशिप मिळवून देण्याचे आमिष दाखवत जामखेड येथील एका व्यावसायिकाची तब्बल ८४ लाख ५३ हजार रुपयांची ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. प्रोसेसिंग फी, परवाना, सिक्युरिटी डिपॉझिट, कागदपत्रांची पडताळणी तसेच विविध प्रशासकीय शुल्कांच्या नावाखाली आरोपींनी वेळोवेळी मोठ्या रकमा उकळल्या. मात्र, अखेर पेट्रोलपंपाची डिलरशिप न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधित व्यावसायिकाने सायबर पोलिस ठाण्यात धाव घेतली. या प्रकरणी बुधवारी दोन जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सायबर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी उदय गुलाबराव शिंदे (वय ५४, रा. रामेश्वर एजन्सी, मार्केटयार्डसमोर, बीड रोड, जामखेड) यांचे जामखेड येथे कृषी सेवा केंद्र आहे. आरोपी सौरभ अग्रवाल व शिंदे (पूर्ण नाव माहीत नाही) यांनी फिर्यादींशी संपर्क साधून 'जिओ' कंपनीचा पेट्रोलपंप उभारण्यासाठी अधिकृत डिलरशिप व परवाना मिळवून देण्याचे आश्वासन दिले.

त्यासाठी कंपनीकडून मंजुरी मिळविणे, प्रोसेसिंग फी, सिक्युरिटी डिपॉझिट, कागदपत्रांची छाननी, परवाना शुल्क तसेच विविध प्रशासकीय प्रक्रियांसाठी पैसे भरावे लागतील, असे सांगत आरोपींनी वेळोवेळी मोठ्या रकमेची मागणी केली. डिलरशिप निश्चित मिळणार असल्याचा विश्वास निर्माण करून त्यांनी फिर्यादींकडून विविध बँक खात्यांमध्ये तसेच ऑनलाइन व्यवहारांद्वारे पैसे जमा करून घेतले.

ऑक्टोबर २०२५ ते सप्टेंबर २०२६ या कालावधीत फिर्यादी उदय शिंदे यांनी आरोपींनी सांगितलेल्या खात्यांमध्ये एकूण ८४ लाख ५३ हजार रुपये जमा केले. एवढी मोठी रक्कम भरूनही ना पेट्रोलपंपाची डिलरशिप मिळाली, ना अधिकृत परवाना मिळाला. उलट आरोपींकडून सतत टाळाटाळ केली जात असल्याने फिर्यादींना संशय आला.

त्यानंतर त्यांनी स्वतः चौकशी केली असता संपूर्ण व्यवहार फसवणुकीचा असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला असून, त्यांचा शोध सुरू आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास सायबर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून, आरोपींनी वापरलेली बँक खाती, ऑनलाइन व्यवहार आणि तांत्रिक पुराव्यांची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

नागरिकांना पोलिसांचे आवाहन

सायबर पोलिसांनी नागरिकांना कोणत्याही कंपनीची डिलरशिप, फ्रँचायझी किंवा गुंतवणुकीच्या नावाखाली मोठी रक्कम भरण्यापूर्वी संबंधित कंपनीकडून अधिकृत पडताळणी करण्याचे आवाहन केले आहे. सोशल मीडिया, फोन किंवा ई-मेलद्वारे मिळणाऱ्या आकर्षक ऑफरवर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची सत्यता तपासावी आणि संशयास्पद व्यवहार आढळल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# दिल्लीतील आंदोलनाला संघर्ष क्रांती संघाचा पाठिंबा; सोनम वांगचूक यांना दिलेल्या वागणुकीचा निषेध, शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या 'विद्यार्थी, युवक आणि शिक्षण वाचवा' आंदोलनाला श्रीगोंदा तालुक्यातील संघर्ष क्रांती संघासह विविध सामाजिक संघटनांनी जाहीर पाठिंबा दर्शविला. नीटसह विविध राष्ट्रीय शैक्षणिक परीक्षांमधील कथित पेपरफुटी, परीक्षा व्यवस्थेतील अनियमितता आणि विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी होत असलेल्या अन्यायाच्या निषेधार्थ श्रीगोंदा येथे तहसीलदार मा. डोंगरे यांच्यामार्फत शासनाला निवेदन देण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, वारंवार होत असलेल्या कथित पेपरफुटीच्या घटनांमुळे लाखो विद्यार्थ्यांचे कष्ट, स्वप्ने आणि भविष्य धोक्यात आले असून देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरील विद्यार्थ्यांचा व पालकांचा विश्वास डळमळीत झाला आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



# जामखेड-श्रीगोंदा रोडवरील भिषण आपघातात दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू

**जामखेड/प्रतिनिधी (समर्थ गांवकरी)**





जामखेड-कर्जत रोडवरील पाटोदा गरडाचे गावाजवळील वळणावर चारचाकी वाहन व आयशर टॅम्पो या दोन वाहनाची समोरासमोर जोराची धडक होऊन झालेल्या भिषण अपघातात श्रीगोंदा तालुक्यात शासकीय सेवेत असलेल्या दोन शासकीय कर्मचाऱ्यांचा जागीच मृत्यू झाला. आपघात एवढा भिषण होता की दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला आहे. या आपघात प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला टॉम्पोचालका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, संबंधित रस्त्याचे काम करणाऱ्या कंत्राटदाराच्या निष्काळजीपणामुळे हा अपघात झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

निखिल मोतीलाल बहुरे, रा.प्लॉट नंबर ६५ राजे संभाजी कॉलनी, जळगाव रोड, जाधववाडी हर्सूल ता.जि.छत्रपती संभाजीनगर, हल्ली रा. श्रीगोंदा, जिल्हा. अहिल्यानगर व रामचंद्र महाजन बहुरे, रा. बेंबळ्याचीवाडी. पोष्ट. खोडेगाव. ता. जि. छत्रपती संभाजीनगर, हल्ली रा. श्रीगोंदा आशी अपघात मयत झालेल्या दोन शासकीय कर्मचाऱ्यांची नावे आहेत.

या बाबत अधिक माहिती अशी की आज रविवार दि १९ जुलै २०२६ रोजी रात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास वरील दोन शासकीय कर्मचारी निखिल मोतीलाल बहुरे व रामचंद्र महाजन बहुरे हे दोघे चुलतभाऊ त्यांच्या मुळगाव संभाजीनगर या ठिकाणाहून श्रीगोंदा येथिल नोकरीच्या ठिकाणी एम.एच -२० जी. ई-३५६२ या क्रमांकाच्या चारचाकी वहानाने चालले होते. तर श्रीगोंदा रोडवरून आयशर टॅम्पो क्रमांक एम. एच १४ - बी. जे २२९३ या वाहनातून जामखेड कडे येत होते. याच वेळी रविवार दि १९ रोजी रात्री अडीच ते तीन वाजण्याच्या सुमारास दोन्ही वाहने जामखेड श्रीगोंदा रोडवरील जामखेड तालुक्यातील पाटोदा गरडाचे गावाजवळील वळणावर आली होती. यावेळी परिसरात रस्त्याला मोठमोठ्या भेगा पडल्याने दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामुळे एका बाजूचा रस्ता बंद करून केवळ एका लेनवरून वाहतूक सुरू होती. दरम्यान याच वेळी दोन्ही वाहने समोरासमोर एकच लेनवर आली आणि यामध्ये याच ठिकाणी भरधाव वेगातील दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक होऊन हा अपघात घडला व या आपघातात चारचाकी वाहनातील शासकीय कर्मचारी निखिल मोतीलाल बहुरे व रामचंद्र महाजन बहुरे या दोन चुलतभावांचा जागीच मृत्यू झाला. आपघात घडल्या नंतर टॅम्पो चालक घटनास्थळाहुन फरार झाला आहे. आपघातात मयत झालेले निखिल मोतीलाल बहुरे, हे मुळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आहेत ते सध्या श्रीगोंदा तहसील कार्यालय येथे महसूल सहायक म्हणून नोकरीस आहेत. तर दुसरे मयत रामचंद्र महाजन बहुरे, हे देखील छत्रपती संभाजीनगर येथील बेंबळ्याचीवाडी येथिल रहीवाशी आसुन ते सध्या श्रीगोंदा येथिल पाटबंधारे विभाग येथे मोजणीदार म्हणून नोकरीस आहेत. दोघेही चुलतभाऊ असल्याचे समजते ते आपल्या श्रीगोंदा येथिल नोकरीच्या ठिकाणी जात असताना जामखेड जवळ सदरचा आपघात घडला आहे. आपघाताची माहिती समजताच जामखेड चे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, पोलिस उपनिरीक्षक गणेश वाघ, पो. कॉ. सचिन चव्हाण, वहान चालक यांनी घटनास्थळी जाऊन जखमींना गाडीचा पत्र तोडुन बाहेर काढले व जामखेड ग्रामिण रुग्णालयात दाखल केले असता ते पुर्वीच मयत झाले असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.



यामार्गावर यापूर्वीही अनेक अपघात झाले असून अनेकांना जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावर मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत. काही ठिकाणी टाकलेले लोखंडी गजही वर आले आहेत, खडकत पुलाजवळ देखील काम रखडले आहे. या भीषण अपघातानंतर राष्ट्रीय महामार्गावरील अपूर्ण आणि धोकादायक रस्त्यांच्या कामाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, संबंधित प्रशासन आणि कंत्राटदाराने तातडीने सुरक्षिततेच्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय कोठारी यांनी केली आहे.

टॅम्पो चालकाचे नाव समजु शकले नसुन तो आपघात घडल्यानंतर घटनास्थळाहुन रात्रीच फरार झाला आहे. पोलीसांनी त्याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघ हे करित आहेत.

